| | |
|---|---|
| MHWS090013412021 | दाखल दिनांक : १६.११.२०२१<br>नोंदणी दिनांक : १६.११.२०२१<br>निकाल दिनांक : .०९.०४.२०२६<br>कालावधी : ०४ व., ०४ म.,२४ दि. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. १७२/२०२१** **निशाणी क्र.–५६**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ५३२/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | गजानन बबन ढोके + १ |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. जी. आर. राठोड |

**गुन्हयाचा तपशिल**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २५/०७/२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | ०५/०८/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०८/११/२०२१ |
| दोषारोप निश्चित तारीख | २५/०८/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १३/०१/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०९/०४/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी – कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२. | **गजानन बबन ढोके**<br>वय : २६ वर्ष, धंदा : शेती<br>**बबन तुकाराम ढोके**<br>वय : ५५ वर्ष, धंदा : शेती<br>दोघे रा. देवठाणा,<br>ता. मानोरा, जि. वाशिम. | २४/०९/२०२१ | एम.सि. आर. वर रवाना केले. | भा.दं.वि. चे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष सोडले | -- | -- |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक ०९/०४/२०२६)

१. प्रस्तुतचा खटला आरोपीं विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०६ सह कलम ३४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. घटना दिनांक २५/०७/२०२१ रोजी रात्री ११:३० वाजताचे सुमारास ग्राम देवठाणा, ता.मानोरा, जि.वाशिम येथे फिर्यादीच्या घरात घडली होती. सदर दिवशी फिर्यादी (प्रकरणामधील फिर्यादी हिचे नावाचा उल्लेख तिची ओळख न जाहीर होण्याच्या हेतून यापूढे नमुद करण्यात येत नाही) जेवन करुन तिच्या पती व मुलांसह झोपली होती. रात्री ११:३० वाजता आ.क्र.१ भिंतीवर चढून आत आला व तिच्या अंगावरील पांघरुन काढून वाईट उद्देशाने तिची छाती दाबली व तिला उठवून बाहेर चल असे म्हणाला. त्यावेळी फिर्यादीने त्याच्या हाताला झटका मारुन जोराने कल्ला केला. त्यावेळी तिचे पती, मुलगा व मुलगी झोपेतून उठले त्यामुळे आ.क्र.१ तेथून पळून गेला. सदर बाब आ.क्र.२ यांना सांगितली असता आ.क्र.२ ने

त्यांच्या पतीला थापडा-बुक्याने मारहाण केली व जीवाने मारण्याची धमकी दिली. फिर्यादी घाबरली असल्याने ती माहेरी निघून गेली व आठ दिवसानंतर तिने दि.०५/०८/२०२१ रोजी मानोरा पोलिस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिला.

३. पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्र. ५३२/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द माझे विद्वान पुर्वअधिकारी यांनी भा.दं.वि. चे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०६ नुसार नि.क्र.१० वर दोषारोप निश्चित केले. आरोपीला दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्याने तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपींची जबानी निशाणी क्र.११ व १२ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ दोन साक्षीदार, सा.क्र.१ फिर्यादी यांना नि.क्र.१४ वर, सा.क्र.२ फिर्यादीचे पती यांना नि.क्र.१५ वर तपासले आहे.

५. अभियोग पक्षास पुरेपुर संधी देवूनही प्रकरणातील इतर महत्वपुर्ण प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ पंच, दुसरे साक्षीदार व तपास अधिकारी यांना पुराव्याकामी हजर करण्यात आले नाही. त्यामुळे दिनांक २८/०७/२०२५ रोजीच्या नि.क्र.१ खालील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नि.क्र.५२ व ५३ वर नोंदविण्यात आले.

६. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

७. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २५/०७/२०२१ रोजी रात्री ११:३० वाजताचे सुमारास ग्राम–देवठाणा, ता.मानोरा, जि. वाशिम येथे आपसी संगणमत करुन आ.क्र.१ ने फिर्यादीला दुखापत करण्याची पुर्वतयारी करुन गृह अतिक्रमण केले व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ४५२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आपसी संगणमत करुन आ.क्र.१ ने वाईट हेतुने फौजदारी बळाचा वापर करुन फिर्यादीचा विनयभंग केला व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३५४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आपसी संगणमत करुन फिर्यादी व त्यांच्या पतीला मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आपसी संगणमत करुन आरोपींनी फौजदारी स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादी व त्यांच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ ते ४ बाबतः–**

८. साक्षीदार क्र.१ प्रकरणातील मुळ फिर्यादी साक्षीदार असून तिने असे कथन केले की, नमुद घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी तिच्या घरी आला व त्याने तिच्या अंगावरील पांघरुन काढून तिची छाती दाबली होती. आरोपीने तिला चाल म्हणून तो पळून गेला. त्यावेळेस फिर्यादी ओरडली असता तिचे पती व मुले उठले. तिच्या पतीने आरोपीस दोन थापडा मारल्या असता आरोपींनी त्यांना जीवाने मारण्याची धमकी दिली. त्याअनुषंगाने फिर्यादीने नि.क्र.१५ व १६ प्रमाणे तक्रार दाखल केली. सतेच सा.क्र.२ यांनी घटना फिर्यादीच्या सांगण्यावरुन कळाल्याचे सांगितले. तसेच त्यांनी पुढे आरोपींनी त्यांना जीवाने मारण्याची धमकी दिली असल्याचे सांगितले. आरोपीतर्फे घेण्यात आलेलया उलटतपासात सा.क्र.१ व २ यांची साक्ष परस्पर विसंगत असल्याचे दिसून येते. सदर दोनही साक्षीदारांनी उलटतपासात घटनेची बाब स्पष्टपणे नाकारली आली. म्हणून त्यांचे पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

९. अभिलेखावरील पुराव्याचे सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीच्या साक्षेस पाठींबामिळणे कामी अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ व्यतिरीक्त इतर कोणताही साक्षीदार तपासला नाही. तसेच सा.क्र.१ फिर्यादी यांनी उलटतपासात त्यांचा आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझौता नि.क्र.४९ व ५० झाल्याचे सांगितले. फिर्यादी व सा.क्र.२ यांच्या साक्षेवरुन फिर्यादीने कथन केलेप्रमाणे घटना सिद्ध झालेली नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील दोष सिद्ध करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ४ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ५ बाबतः–**

१०. वरील सर्व बाबींचा तुलनात्मक पडताळणी केली असता असे दिसून येते की, आरोपीने कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीचा वाईट हेतुने फौजदारी बळाचा

वापर करुन फिर्यादीचा विनयभंग केल्याची व तिच्या पतीस दुखापत करुन जीवे मारण्याची बाब निःसंदेहपणे सिध्द झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०६ सहकलम ३४ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.५ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आ.क्र.१ **गजानन बबन ढोके** व आ.क्र.२ **बबन तुकाराम ढोके** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०६ सहकलम ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.04.09 17:20:43 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**

दि. ०९/०४/२०२६

न्यायदंडाधिकारी, (प्रथम वर्ग),
(न्यायालय क्र.२), मानोरा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (L.G.) |
| Court | - | (Smt. T. G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | - | 09/04/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 09/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 09/04/2026 |